**वाचले** - १. लेखा विभागाकडील आदेश क्र. लेख/१अ/कावि/११४८/२०१८, दि. २५-१०-२०१८
२. प्रशासन विभागाकडील आदेश क्र. प्रशा/१/कावि/१०१०/२०२१, दि. ०५-१०-२०२१
३. स्थापत्य विभागाकडील परिपत्रक क्र. स्था/शअ/ता/४/२९४/२०२१; दि. १५-११-२०२१
४. मा.आयुक्त सो. यांचेकडील दि. १०-१२-२०२१ रोजीचा मंजूर प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मुख्यलेखापरिक्षण विभाग
क्र. मुलेप/१अ/कावि/१६६/२०२१
दि. १६-१२-२०२१

**विषय- निविदा नस्ती मुख्यलेखापरीक्षण विभागाकडे अभिप्रायाकामी सादर करणेबाबत. . .**

आदेश

महापालिकेच्या विविध विभागांमार्फत करण्यात येणारी खरेदी, स्थापत्य-पाणीपुरवठा-विद्युत विषयक कामे तसेच इतर भांडवली कामांच्या अनुषंगाने निविदा प्रणाली राबवुन खाजगी ठेकेदारांमार्फत कामकाज करुन घेण्यात येत असते. उपरोक्त वाचले क्र. १ चे आदेशान्वये निविदा नस्तीवरील अभिप्रायांच्या कार्यपध्दतीबाबत आदेशित करण्यात आलेले आहे. प्रशासन विभागाकडील उपरोक्त वाचले क्र. १ च्या आदेशान्वये र.रु. १ कोटींच्या वरील रकमेसंदर्भात निविदा समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन स्थापत्य विभागामार्फत उपरोक्त वाचले क्र. ३ अन्वये निविदा कार्यपध्दतीबाबत परिपत्रक निर्गत करण्यात आलेले असून निविदा नस्तींबाबतची कार्यपध्दती प्रणाली निश्चित करणेत आलेली आहे.

महापालिकेच्या विभागांमार्फत प्रसिध्द होणाऱ्या निविदा नस्तींची लेखापरीक्षणाचे दृष्टीकोनातून तपासणी होणे आवश्यक आहे. जेणेकरुन भविष्यात उपस्थित होऊ शकणाऱ्या आक्षेपांचे निराकरण वेळीच होऊन भविष्यात उपस्थित होणाऱ्या लेखापरीक्षण आक्षेपांची संख्या मर्यादित राहू शकेल.

सबब, प्रस्तुतचे आदेशान्वये निविदा नस्तींवरील अभिप्रायांबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करणेत यावा:

१. र.रु. १ कोटी च्या वरील रकमांकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदांच्या अनुषंगाने निविदा प्रसिध्दी पश्चात निविदा समितीचे मान्यतेनंतर व कार्यारंभ आदेश देणेपूर्वी सदरची नस्ती लेखापरीक्षणाचे दृष्टीकोनातून तपासणीकरीता तसेच अभिप्रायार्थ लेखापरीक्षण विभागाकडे सादर करावी. लेखापरीक्षण विभागामार्फत सदरची नस्ती मा.आयुक्त / मा.अति.आयुक्त यांचेकडे सादर केली जाईल.
२. र.रु. १ कोटी पेक्षा कमी रकमेच्या सर्व निविदा नस्ती मुख्यलेखापरीक्षकांचे तपासणीनंतर मा.आयुक्त / अति.आयुक्त यांचेकडे मान्यतेकरीता सादर कराव्यात. तदनंतरच मा.स्थायी समितीचे मंजूरीकरीता पाठविणेत याव्यात.

प्रस्तुत आदेशाची नोंद सर्व विभागप्रमुखांनी घ्यावयाची असुन त्यानुसारच यापुढे निविदा नस्ती सादर करणेची दक्षता घ्यावी.

सही/-
(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति,
सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख

मुख्यलेखापरीक्षक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

D:\TABLE-1A\Audit\Tender\Letter & Other.docx